(मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ पोट कलम(१) व इमारतीचे नियमन नियम १९६७ प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणेस, दुरुस्त करणेस, फेरफार किंवा वाढविणेस द्यावयाचा परवाना)

ग्रामपंचायत आसनगांव ता. शहापूर.

जि. ठाणे.

तारीख १५/११/२०१३

श्री. कनक प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. बिपीन रामजी छेडा वडाळ ३ रा. ५०३ सनराईज बिजनेस पार्क वागळे इंडस्ट्रियल इस्टेट रोड नं. १६ ठाणे (पश्चिम) ४०० ६०४ यांसी

संदर्भ- आपला दि. ११/६/२०१३ चा अर्ज

आपला ~~घर बांधणेबद्दलचा, दुरुस्तीचा, फेरफार करण्याचा किंवा वाढविण्याचा~~ निवासी वाणिज्य वापरासाठी इमारत बांधण्यास अर्ज ता. १३/६/२०१३ रोजी मिळाला. त्याप्रमाणे आपणांस कळविण्यांत येते कीं, पंचायत ठराव नं. १८/२४ ता. २६/०६/२०१३ च्या अन्वये इमारत बांधण्यास, दुरुस्त करण्यास, फेरफार करण्यांस किंवा वाढविण्यास (रेव्हिन्यू खात्याचे परवानगीस पात्र राहून) १९५८ चा ग्रामपंचायत कायदा कलम ५२ व ५३ मधील तरतुदीस अधिक राहून खालील अटीवर मंजूरी देण्यांत येत आहे.

## कारणे/ अटी

बांधकाम परवानगी मौजे आसनगांव ......सर्वे/ हिस्सा ११८/२पै, ११८/३पै, ११८/२पै, ११८/३पै ~~बिनशेती प्लॉट नं.~~ एकुण क्षेत्र १५४००चौ. मीटर

जुने घर नं. —— वार्ड नं. ३

१) सदरहू जागा ही आपल्या मालकीची आहे, असे गृहीत धरुन खालील शर्तीनुसार मे. जिल्हाधिकारी साहेब, ठाणे यांचोकडील आदेश नं. महसूल कक्ष/टे-१/एनएपी चे प्रमाणे बांधकाम करणेस मंजुरी देणेत येत आहे. जिल्हाधिकारी ठाणे दि. ८ ऑगस्ट २०१२

२) नकाशामध्ये वर्शविल्याप्रमाणें बांधकाम करावे लागेल, त्यात पंचायतीचे परवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

३) नगर रचना ठाणे ने मंजूर केल्याप्रमाणेंच बाग व रस्ते मोकळे सोडावे लागतील. आणि त्या ठिकाणी योग्य अशी झाडे लावून जगविणे बंधनकारक आहे.

४) बांधकामाचा कोणताही भाग सरकारी अथवा दुसऱ्याचे जागेत गेल्यास तो आपणांस स्वखर्चाने मोकळा करुन देणें भाग पडेल.

५) गांवठाणाव्यतिरिक्त खाजगी/ सरकारी अगर रस्त्याचे बाजूस बांधकाम करतांना संबंधित खात्याची परवानगी असलेशिवाय बांधकाम करु नये.

६) मुंबई ग्रा. पं. अधिनियम १९५८ चे कलम १७७ नुसार जिल्हा परिषद उपविधी इमारत बांधकाम सार्वजनिक रस्त्याचे बाजूने गटारापासून किमान अंतर ....१०..... फुट दोन्ही बाजूने किमान अंतर ...१०....फुट व मागील बाजूने किमान अंतर .........१०......... फुट (प्लॅनप्रमाणे) सोडणे बंधनकारक आहे.

७) आपल्या इमारतीच्या सांडपाण्याची व्यवस्था आपणांस स्वतःचे जागेत अगर तुमच्या इमारतीपासून पंचायतीचे मुख्य गटारापर्यंत स्वखर्चाने करणेची आहे.

८) घराचे बांधकाम सुरु करणेपूर्वी सेफ्टी टँक आराखडयाप्रमाणें बांधणेंत यावे.

९) पाणी पुरवठा देण्याची जबाबदारी जबाबदारी ग्रामपंचातीची रहाणार नाही.

१०) बांधकाम करतांना शेजाऱ्यास अगर सार्वजनिक वहातुकीस अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

११) बांधकामास लागणारे पाणी ग्रा. पं. च्या मालकीच्या सार्वजनिक विहीर, तलावातून पंचायतीचे परवानगीशिवाय घेता येणार नाही.

१२) बांधकाम सुरु करणेपूर्वी पंचायतीस कळविणे भाग आहे. एक वर्षाचे आंत बांधकाम सुरु न केल्यास, नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.

१३) बांधकाम साहित्य पंचायतीचे आगाऊ परवानगीशिवाय सार्वजनिक रस्त्यावर ठेवता येणार नाही.

१४) बांधकाम पूर्ण होताच वास्तुशास्त्रज्ञ यांचे मुल्यांकासह पंचायतीस लेखी कळविणेस भाग पडेल, इमारत वापरणेस योग्य असल्याचा दाखला या कार्यालयाकडून घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करता येणार नाही.

१५) वरील शर्तीनुसार दिलेली परवानगी आपणांस मान्य नसल्यास, मे. मुख्यकार्यकारी अधिकारी, जि. प. ठाणे. यांचेकडे दोन महिन्याचे आंत अपील करावे.

१६) नियमानुसार योग्य मार्जिन सोडून आपले स्वतःचे जागेतच बांधकाम करणें आवश्यक आहे.

सदर परवानगी महसूल खात्याचे नियम व अटींस पात्र राहून देण्यांस येत आहे.

१७) सदर बांधकाम नाहरकत परवाना A.D.T.P ठाणे यांचे कडील मंजूर नकाशा प्रमाणे १३.०४६ चौ. मीटर बांधकाम करणे कामी देण्यात आला असे.

सरपंच
ग्रामपंचायत,आसनगांव,

दिनांक : १५ / ११/२०१३